शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 JAN 2026

सकाळ

# गोखले महाविद्यालयातील कार्यशाळेला प्रतिसाद

कोल्हापूर, ता. ३० : गोपाळ कृष्ण गोखले महाविद्यालय, शिवाजी विद्यापीठ, न्यू कॉलेज क्लस्टर योजनेअंतर्गत 'रिसर्च अपॉर्च्युनिटी आफ्टर सायन्स ग्रॅज्युशन' यावरील एकदिवसीय कार्यशाळा झाली. राजाराम कॉलेजमधील इलेक्ट्रॉनिक्स विभागप्रमुख डॉ. पंकज लांडे, शिवाजी विद्यापीठातील सहायक संचालक डॉ. टी. डी. डोंगळे, शिवाजी विद्यापीठातील कॉम्प्युटर सायन्स विभागातील सहायक प्रा. डॉ. कबीर खराडे, प्राचार्य डॉ. आर. बी. भुयेकर यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

प्रा. डॉ. डी. व्ही. आवळे यांनी प्रास्ताविक केले. प्रथम सत्रात डॉ. लांडे यांनी विद्यार्थ्यांनी पेटंट मिळविण्यासाठी संशोधनात्मक बुद्धिमता धारण करणे आवश्यक असल्याचे सांगितले. अध्यक्षस्थानी डॉ. बी. डी. आत्तार होते. द्वितीय सत्रात डॉ. डोंगळे यांनी विद्यार्थ्यांनी बी. एस्सी. पदवीनंतर विविध देशात उच्च शिक्षणासाठी स्कॉलरशीप दिली जाते याची माहिती दिली. डॉ. सी. बी. पाटील अध्यक्षस्थानी होते. तिसऱ्या क्षेत्रात डॉ. खराडे यांनी कॉम्प्युटर सायन्स क्षेत्रात विद्यार्थ्यांना सर्वाधिक संधी असून विश्लेषणात्मक तथा चिकित्सक दृष्टिकोन किंवा तुलनात्मक अभ्यास केल्यास या क्षेत्रात चांगले भविष्य लाभेल, असे मत व्यक्त केले.

गणित आणि इलेक्ट्रॉनिक्स विभागातर्फे कार्यशाळेचे आयोजन केले. डॉ. डी. व्ही. आवळे अध्यक्षस्थानी होते. उपप्राचार्य एन. टी. पाटील, पर्यवेक्षक एम. एल. धनवडे, प्रा. पी. बी. झावरे, डॉ. डी. व्ही. आवळे, प्रा. एस. आर. घाटगे, प्रा. एस. एन. जाधव आदी उपस्थित होते. प्रा. स्नेहल कवठेकर यांनी सूत्रसंचालन केले.

3 1 JAN 2026

लोकमत

# क्विक Update

## तंत्रज्ञान स्वीकारासाठी सकारात्मक दृष्टिकोन महत्त्वाचा : डॉ. ताटपुजे

**कोल्हापूर :** बदलत्या शैक्षणिक तंत्रज्ञानाच्या स्वीकारासाठी शिक्षकांचा सकारात्मक दृष्टिकोन अत्यंत महत्त्वाचा असल्याचे प्रतिपादन पुणे येथील विद्यादीप फाउंडेशनचे संशोधक सल्लागार डॉ. दीपक ताटपुजे यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने पीएम-उषा योजनेंतर्गत "विविध विद्याशाखांच्या अध्यापन व अध्ययनासाठी ई-कन्टेन्ट विकसन आणि ऑनलाइन पेडॅगॉजी" या विषयावरील दोन दिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते. वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. वर्षा मैंदर्गी अध्यक्षस्थानी होत्या. यावेळी उपकुलसचिव विनय शिंदे, सहायक कुलसचिव दिलीप मोहाडीकर, संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. नितीन रणदिवे यांनी प्रास्ताविक केले.

3 1 JAN 2026

पुढारी

# विवेकानंद महाविद्यालयामध्ये मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालय मराठी विभाग, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आणि शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उत्साहात साजरा झाला. पंधरवड्यामध्ये व्याख्याने, निबंध, वक्तृत्व, शुद्धलेखन व अभिवाचन स्पर्धा तसेच शासकीय मुद्रणालय भेट असे उपक्रम राबविण्यात आले. मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे उद्घाटन प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात यांच्या हस्ते झाले. 'बोलीचा जागर' या विषयावर मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर यांनी मार्गदर्शन केले. 'मराठी भाषा आणि रोजगाराच्या संधी' या विषयावर डॉ. प्रदीप पाटील यांनी विचार मांडले. शासकीय मुद्रणालयातील भेटीवेळी तेथील अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना मुद्रणालयाच्या कामकाजाची व त्यातील रोजगाराच्या संधी याविषयी माहिती दिली. पंधरवड्याचे संयोजन मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर, प्रा. डॉ. प्रदीप पाटील, प्रा. रोहिणी रेळेकर यांनी केले.

31 JAN 2026

सकाळ

# ए. आय. वर्तमानाचा साथीदार : डॉ. टाकळे

कोल्हापूर, ता. ३० : 'कोणतीही कामे गतीने आणि अधिक विश्वासाने पूर्ण करण्यासाठी 'ए.आय.'ची मदत आवश्यक आहे, म्हणूनच आपण 'ए.आय.'कडे वर्तमानाचा साथीदार म्हणून पाहू शकतो,' असे मत विद्यापीठाचे संशोधक प्रा. डॉ. एम. व्ही. टाकळे यांनी व्यक्त केले.

राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज येथे आयोजित एकदिवसीय अग्रणी महाविद्यालय कार्यशाळेत ते बोलत होते. प्रभारी प्राचार्य डॉ. डी. आर. भोसले अध्यक्षस्थानी होते. डॉ. भोसले यांनी ए. आय. कोर्सबाबत माहिती दिली. तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून पदार्थशास्त्र विभागाचे डॉ. सत्यजित पाटील, विलिंग्डन महाविद्यालयाच्या पदार्थशास्त्र विभागाचे युगेन कुलकर्णी उपस्थित होते. आयक्युएससी प्रमुख डॉ. यु. एस. शेळके, डॉ. बी. वाय. सायमोते, डॉ. डी. एस. कुंभार, प्रा. डी. एम. माळवेकर उपस्थित होते.

3 1 JAN 2026

सकाळ

# ‘महावीर’मध्ये मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त काव्यवाचन

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ३० : राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई तसेच महावीर महाविद्यालयतर्फे मराठी भाषा विभागातर्फे आयोजित मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यांतर्गत (२०२५–२६) बी.ए.बी.एड. विद्यार्थ्यांचा काव्यवाचन कार्यक्रम झाला.

प्रा. डॉ. गोपाळ गावडे उपस्थित होते. प्राचार्य डॉ. अद्वैत जोशी अध्यक्षस्थानी होते. मराठी विभागप्रमुख प्रा. जयवंत दळवी प्रमुख उपस्थित होते. डॉ. गावडे यांनी कविता ही केवळ शब्दांची मांडणी नसून ती आत्मानुभवातून उमटलेली संवेदनशील अभिव्यक्ती असल्याचे प्रतिपादन केले. बी.ए.बी.एड. विद्यार्थ्यांनी विविध सामाजिक, भावनिक, मानवी आणि संवेदनशील विषयांवरील आशयपूर्ण कविता प्रभावी शैलीत सादर केल्या. आदित्य धनवडे, सबिया नालबंद, शुभांगी साठे, मोनाली पवार, मधुमती पवार, जयश्री ढवण, पूजा ढवण, गायत्री खांडेकर, अनुप कांबळे, पल्लवी गोसावी, अनुराधा सावंत यांनी काव्यवाचन सादर केले.

यावेळी प्रा. डॉ. गोमटेश्वर पाटील, प्रा. डॉ. शरद गायकवाड, प्रा. विष्णू चव्हाण आणि प्रा. डॉ. सुप्रिया आवारे यांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे कौतुक केले. ज्ञानेश्वरी कुरळे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. स्नेहल पाटील, श्रावणी राऊत यांनी सूत्रसंचालन केले. आदित्य धनवडे यांनी आभार मानले. प्रा. डॉ. सुप्रिया आवारे, प्रा. विष्णू चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन केले.

3 1 JAN 2026
तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठाच्या नेतृत्व विकास शिबिराचा समारोप

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग, सेंटर फॉर लीडरशिप डेव्हलपमेंट आणि बहाई अकॅडमी, पाचगणी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पाच दिवसीय नेतृत्व विकास शिबिराचा समारोप झाला. शिबिराच्या समारोपप्रसंगी शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

डॉ. शिंदे यांनी, युवकांवरील जबाबदाऱ्या, समाजघडणीत युवक नेतृत्वाची भूमिका तसेच आदर्श युवक नेत्यांचे गुणधर्म यावर मार्गदर्शन केले. यावेळी बहाई अकॅडमीचे संचालक लेसन आझादी यांनी मूल्याधिष्ठित नेतृत्वाची आवश्यकता विषद केली. अमेरिकेतील अर्थशास्त्राचे प्रा.जेम्स वेस्ट यांनी आंतरराष्ट्रीय एकात्मतेच्या गरजेविषयी सांगितले. विद्यार्थी विकास संचालक डॉ. टी. एम. चौगुले यांनी प्रास्ताविक केले. नेतृत्त्व विकास केंद्राचे समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांनी आभार मानले. शिबिराच्या कालावधीत नेतृत्त्व कौशल्य, व्यक्तिमत्व विकास, सामाजिक बांधिलकी आणि मूल्याधिष्ठित नेतृत्त्व यावर विविध सत्रांचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थी विकास विभागाचे सुरेखा. आडके, विजय इंगवले, बहाई अकॅडमीचे पराग, प्रीती, मारूती कांबळे, चव्हाण, अल्पेश उपस्थित होते.

31 JAN 2026

सकाळ

# अवतीभवती

## मास कम्युनिकेशन विभागातर्फे आज कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागातर्फे उद्या, शनिवारी 'पर्यावरणीय लढे आणि प्रसारमाध्यमे' या विषयावर कार्यशाळा होणार आहे. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते सकाळी अकरा वाजता कार्यशाळेचे उद्‌घाटन होईल. मास कम्युनिकेशन विभागातील या कार्यशाळेत गोव्यातील ज्येष्ठ पर्यावरण अभ्यासक रमेश गावस हे 'पर्यावरणीय लढे' या विषयावर, ज्येष्ठ पत्रकार प्रभाकर ढगे 'पर्यावरण पत्रकारितेची मीमांसा' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी पर्यावरण अभ्यासक शरद आजगेकर, विनायक देसाई यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत. ही कार्यशाळा सर्वांसाठी मोफत असून, पत्रकार तसेच पर्यावरणविषयी आस्था असणाऱ्यांनी त्यात सहभागी व्हावे, असे आवाहन मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

3 1 JAN 2026

पुढारी

# 'पर्यावरण, प्रसारमाध्यमे' विषयावर आज शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने शनिवारी (दि. ३१) 'पर्यावरणीय लढे व प्रसारमाध्यमे' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा आयोजित केली आहे. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते मास कम्युनिकेशन विभागात सकाळी ११ वाजता कार्यशाळेचे उद्घाटन होईल.

कार्यशाळेत गोव्यातील ज्येष्ठ पर्यावरण अभ्यासक रमेश गावस हे 'पर्यावरणीय लढे' या विषयावर, तर गोव्यातील ज्येष्ठ पत्रकार प्रभाकर ढगे 'पर्यावरण पत्रकारितेची मीमांसा' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. याप्रसंगी पर्यावरण अभ्यासक शरद आजगेकर, विनायक देसाई यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत. कार्यशाळा सर्वांसाठी मोफत असून पत्रकार, पर्यावरण अभ्यासकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

31 JAN 2026

लोकमत



शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवन इमारतीच्या प्रांगणात शुक्रवारी हुतात्म्यांना अभिवादन केले.

# शिवाजी विद्यापीठामध्ये महात्मा गांधी यांना अभिवादन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त शुक्रवारी शिवाजी विद्यापीठात हुतात्मा दिन पाळण्यात येऊन दोन मिनिटे मौन राखून अभिवादन करण्यात आले.

शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवन इमारतीच्या प्रांगणात प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासह अधिकारी आणि प्रशासकीय सेवकांनी सकाळी ठीक ११ वाजता दोन मिनिटे स्तब्धता पाळून महात्मा गांधी यांच्यासह हुतात्म्यांना अभिवादन केले.

यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, इनोव्हेशन व इनक्युबेशन केंद्राचे संचालक डॉ. सागर डेळेकर, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, संगणक केंद्राचे संचालक अभिजीत रेडेकर यांच्यासह प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यापीठाच्या सर्व विभागांत आणि प्रशासकीय विभागांमध्ये ही सर्व विभाग प्रमुखांसह शिक्षक, सेवक आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी यांनी हुतात्म्यांना अभिवादन केले.

31 JAN 2026

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात हुतात्मा दिन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवन इमारतीच्या प्रांगणात प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासह अधिकारी आणि प्रशासकीय सेवकांनी सकाळी ११ वाजता दोन मिनिटे स्तब्धता पाळून महात्मा गांधी यांच्यासह हुतात्म्यांना अभिवादन केले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, इनोव्हेशन व इन्क्युबेशन केंद्राचे संचालक डॉ. सागर डेळेकर, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, संगणक केंद्राचे संचालक अभिजित रेडेकर आदी उपस्थित होते. विद्यापीठाच्या सर्व अधिविभागांत आणि प्रशासकीय विभागांमध्येही सर्व अधिविभागप्रमुखांसह शिक्षक, सेवक आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी यांनी आपापल्या जागेवर उभे राहून हुतात्म्यांना अभिवादन केले.

3 1 JAN 2026

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अखिल भारतीय सॉफ्टबॉल स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा पुरुष संघ जाहीर

- अमरावती येथे १ ते ५ फेब्रुवारीदरम्यान रंगणार आंतर-विद्यापीठ स्पर्धा
- स्पर्धेच्या तयारीसाठी विशेष एकत्रित सराव शिबिर




कोल्हापूर : संघातील खेळाडू मान्यवरांसह.

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

अमरावती (महाराष्ट्र) येथे दि. १ ते ५ फेब्रुवारी या कालावधीत होणाऱ्या अखिल भारतीय आंतर-विद्यापीठ सॉफ्टबॉल पुरुष स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा पुरुष संघ घोषित करण्यात आला असून संघ स्पर्धेसाठी रवाना झाला आहे.

या स्पर्धेच्या तयारीसाठी शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडांगणावर गेले आठ दिवस विशेष एकत्रित सराव शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये खेळाडूंना तांत्रिक कौशल्ये, शारीरिक तंदुरुस्ती व सामन्याची रणनीती यांचे सखोल प्रशिक्षण देण्यात आले. संघात एकूण १६ खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. संघाचे कर्णधारपद रोहन बाबर याच्याकडे सोपविण्यात आले आहे. संघामध्ये वैभव गाडे, अनिकेत गुजले, आशुतोष मिश्रा, विश्वजीत ठोंबरे, प्रेम लालबेग, श्रुतीक पाटील, प्रथमेश गोरे, संस्कार माळी, पार्थ शिंदे, अनिकेत कदम, पृथ्वीराज अर्जुन, निलेश रिळेकर, ओमकार नेर्लेकर, राजवर्धन पाटील व तुषार बाबर यांचा समावेश आहे. संघाच्या प्रशिक्षकपदी प्रा. विनायक जाधव यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या संघाला प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे तसेच क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले आहे. शिवाजी विद्यापीठाचा संघ या स्पर्धेत उत्तम कामगिरी करून यश संपादन करेल, असा विश्वास क्रीडा विभागाने व्यक्त केला आहे.

31 JAN 2026

पुण्यनगरी

# सॉफ्टबॉल स्पर्धेसाठी विद्यापीठ पुरुष संघ जाहीर

**कोल्हापूर :** अमरावती येथे दि. १ ते ५ फेब्रुवारी या कालावधीत आयोजित अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल पुरुष स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला असून, तो स्पर्धेसाठी रवाना झाला. शिवाजी विद्यापीठाच्या मैदानावर गेले आठ दिवस विशेष एकत्रित सराव शिबिर झाले. संघात एकूण १६ खेळाडूंचा समावेश करण्यात आला आहे. संघात रोहन बाबर (कर्णधार), वैभव गाडे, अनिकेत गुजले, आशुतोष मिश्रा, विश्वजित ठोंबरे, प्रेम लालबेग, श्रुतीक पाटील, प्रथमेश गोरे, संस्कार माळी, पार्थ शिंदे, अनिकेत कदम, पृथ्वीराज अर्जुन, नीलेश रिळेकर, ओमकार नेर्लेकर, राजवर्धन पाटील, तुषार बाबर यांचा समावेश आहे. प्रशिक्षकपदी प्रा. विनायक जाधव यांची निवड झाली. संघाला प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांचे प्रोत्साहन लाभले.

3 1 JAN 2026

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाचा सॉफ्टबॉल संघ जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

अमरावती (महाराष्ट्र) येथे १ ते ५ फेब्रुवारी या कालावधीत आयोजित अखिल भारतीय आंतर-विद्यापीठ सॉफ्टबॉल पुरुष स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा संघ जाहीर करण्यात आला असून तो स्पर्धेसाठी रवाना झाला आहे.

विद्यापीठाच्या मैदानावर गेले आठ दिवस विशेष एकत्रित सराव शिबिर झाले. संघात १६ खेळाडूंचा समावेश आहे.

प्रशिक्षकपदी प्रा. विनायक जाधव यांची निवड झाली. संघाला प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांचे मार्गदर्शन लाभले.



31 JAN 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# अखिल भारतीय सॉफ्टबॉल स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा पुरूष संघ जाहीर

**कोल्हापूर, (महान्यूज अँड व्ह्यूज) :**

अमरावती (महाराष्ट्र) येथे दि. १ ते ५ फेब्रुवारी या कालावधीत आयोजित अखिल भारतीय आंतर-विद्यापीठ सॉफ्टबॉल पुरुष स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला असून तो स्पर्धेसाठी रवाना झाला.

शिवाजी विद्यापीठाच्या मैदानावर गेले आठ दिवस विशेष एकत्रित सराव शिबिर झाले. संघात एकूण १६ खेळाडूंचा समावेश करण्यात आला. त्यात रोहन बाबर (कर्णधार), वैभव गाडे, अनिकेत गुजले, आशुतोष मिश्रा, विश्वजीत ठोंबरे, प्रेम लालबेग, श्रुतीक पाटील, प्रथमेश गोरे, संस्कार माळी, पार्थ शिंदे, अनिकेत कदम, पृथ्वीराज अर्जुन, निलेश रिळेकर, ओमकार नेर्लेकर, राजवर्धन पाटील, तुषार बाबर, यांचा समावेश आहे. प्रशिक्षकपदी प्रा.विनायक जाधव यांची निवड झाली. संघाला प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ.शरद बनसोडे यांचे प्रोत्साहन लाभले.



3 1 JAN 2026
लोकमत

# सॉफ्टबॉल स्पर्धेसाठी विद्यापीठ संघ रवाना

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** अमरावती येथे उद्या, रविवारपासून होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल पुरुष स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला असून, तो स्पर्धेसाठी रवाना झाला.

शिवाजी विद्यापीठाच्या मैदानावर गेले आठ दिवस विशेष एकत्रित सराव शिबिर झाले. संघात एकूण १६ खेळाडूंचा समावेश आहे. त्यात रोहन बाबर (कर्णधार), वैभव गाडे, अनिकेत गुजले, आशुतोष मिश्रा, विश्वजित ठोंबरे, प्रेम लालबेग, श्रुतीक पाटील, प्रथमेश गोरे, संस्कार माळी, पार्थ शिंदे, अनिकेत कदम, पृथ्वीराज अर्जुन, नीलेश रिळेकर, ओमकार नेर्लेकर, राजवर्धन पाटील, तुषार बाबर यांचा समावेश आहे.

प्रशिक्षकपदी प्रा. विनायक जाधव यांची निवड झाली. प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. शरद बनसोडे यांचे प्रोत्साहन लाभले.

जनसंपर्क कक्ष

31 JAN 2026 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अजितदादांकडून भरघोस निधीची तरतूद

## शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे : निधीतून साकारले विविध अभ्यासक्रम

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना शिवाजी विद्यापीठाप्रती मोठी आस्था होती. त्यामुळेच त्यांनी शिवाजी विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवाच्या निमित्ताने राज्याच्या अर्थसंकल्पात भरीव निधीची तरतूद केली. यातून विविध अभ्यासक्रमासह अनेक अभ्यासपुर्ण उपक्रम झाले आहेत, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठात आयोजित




शोकसभेत ते बोलत होते. सभेच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव होत्या. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात गुरूवारी ही शोकसभा झाली. शोकसभेत डॉ. शिंदे यांनी शोकप्रस्तावाचे वाचन केले.

अजितदादांच्या निधनामुळे एक कुशल, राजकीय, सामाजिक व प्रशासकीय जाण असणारे, तडफदार आणि उमदे नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेले आहे, अशा शब्दांत विद्यापीठाच्यावतीने श्रद्धांजली वाहण्यात आली.

राज्याच्या अर्थसंकल्पात अजित पवार यांनी दिलेल्या भरघोस निधीतून विद्यापीठात यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट, स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँन्ड टेक्नॉलॉजी, बाळासाहेब देसाई अध्यासन, राजर्षी शाहू म्युझियम कॉम्प्लेक्स इत्यादी उपक्रमांची उभारणी करता येऊ शकली, असे त्यांनी सांगितले.

यावेळी डॉ. गोविंद कोळेकर, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर, सागर लांडे, डॉ. निखिल गायकवाड, डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी श्रद्धांजलीपर वाहिली. शोकसभेला परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील यांच्यासह विविध अधिविभागांचे प्रमुख, व सेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

31 JAN 2026

सकाळ



# शिवाजी विद्यापीठात हुतात्मा दिन

कोल्हापूर : राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त आज शिवाजी विद्यापीठात हुतात्मा दिन पाळण्यात येऊन दोन मिनिटे मौन राखून अभिवादन केले. मुख्य प्रशासकीय भवन इमारतीच्या प्रांगणात प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासह अधिकारी आणि प्रशासकीय सेवकांनी सकाळी ११ वाजता दोन मिनिटे स्तब्धता पाळून महात्मा गांधी यांच्यासह हुतात्म्यांना अभिवादन केले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, इनोव्हेशन व इनक्युबेशन केंद्राचे संचालक डॉ. सागर डेळेकर, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, संगणक केंद्राचे संचालक अभिजित रेडेकर यांच्यासह प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. विद्यापीठाच्या सर्व अधिविभाग आणि प्रशासकीय विभागांमध्येही सर्व अधिविभाग प्रमुखांसह शिक्षक, सेवक आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी यांनी आपापल्या जागेवर उभे राहून हुतात्म्यांना अभिवादन केले.

३1 JAN 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदासाठी ११५ अर्ज

## कॅम्पसवरील १४ जणांचा समावेश; फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात छाननीची प्रक्रिया

■ सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. ३० : दक्षिण महाराष्ट्राची ज्ञानगंगा असणाऱ्या शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदासाठी निवड प्रक्रिया सुरू आहे. त्यासाठी इच्छुक असलेल्या सुमारे ११५ उमेदवारांनी अर्ज केले आहेत. त्यात विद्यापीठ कॅम्पसवरील आजी-माजी अधिकारी, वरिष्ठ प्राध्यापक अशा चौदा जणांचा समावेश आहे. फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात या अर्जांवरील छाननीची प्रक्रिया होण्याची शक्यता आहे.**



विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचा कार्यकाळ सहा ऑक्टोबर रोजी संपला. त्यापूर्वी मे महिन्यात कुलगुरू निवडीसाठी

कुलपती कार्यालयास कुलगुरू शोध समितीवर विद्यापीठ कायद्यानुसार व्यवस्थापन परिषद आणि विद्या परिषद या अधिकार मंडळांनी एकत्रितपणे

आयआयटी इंदूरचे संचालक प्रा. सुहास जोशी नामनिर्देशन केले. त्यांनी मेच्या अखेरच्या आठवड्यात समिती सदस्य म्हणून काम करण्यासाठी संमती दिली. त्यानंतर शोध समिती स्थापन झाली.

या समितीने कुलगुरुपदासाठी इच्छुक असणाऱ्यांकडून अर्ज मागविण्याची प्रक्रिया २३ डिसेंबर रोजी सुरू केली. इच्छुकांना अर्ज करण्यासाठी २७ जानेवारी रोजी सायंकाळी पाचपर्यंत

मुदत देण्यात आली होती. या मुदतीत विद्यापीठ कार्यक्षेत्रासह राज्यातील साधारणतः ११५ उमेदवारांनी अर्ज केले आहेत. त्यांनी स्वतःची माहिती हार्ड आणि सॉफ्ट कॉपीमध्ये या प्रक्रियेतील

### मार्चमध्ये नवे कुलगुरू मिळण्याची शक्यता

■ कुलगुरू शोध समितीकडे सादर झालेल्या इच्छुक उमेदवारांच्या अर्जांची छाननी प्रक्रिया आता होईल. त्यातून समितीकडून २५ उमेदवारांची नावे शॉर्टलिस्ट होतील. त्यामधील पाच उमेदवारांची नावे कुलपतींकडे अंतिम मुलाखत प्रक्रियेसाठी समितीकडून सादर केली जातील. ही प्रक्रिया लक्षात घेता मार्चमध्ये विद्यापीठाला नवे कुलगुरू मिळण्याची शक्यता विद्यापीठ वर्तुळातून व्यक्त होत आहे.


### अर्ज करणारे उमेदवार

■ कुलगुरुपदासाठी विद्यापीठ कॅम्पसवरील चौदा जणांनी अर्ज केले आहेत. त्यात विद्यमान प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, डॉ. एस. एस. चव्हाण, सागर डेळेकर, एस. एस. कोळेकर, के. एम. गरडकर, अनिल घुले, जी. बी. कोळेकर, आर. व्ही. गुरव, आर. जी. सोनकवडे, एस. एस. महाजन, ज्ञानदेव तळुले, नीशा मुडे-पवार, एस. एस. देशमुख, रामचंद्र पवार, तर विद्यापीठ बाहेरील अन्य उमेदवारांमध्ये होमीभाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत, शिवाजी विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, माजी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, मुंबईतील नितीन देसाई, नितीन सरदेसाई आदींची नावे आहेत.

नोडल ऑफिसर प्रा. एस. सावन्त यांना सादर केली आहे. अर्ज केलेल्या उमेदवारांना आता छाननीची प्रतीक्षा लागली आहे.

3 1 JAN 2026

जनप्रवास



कोल्हापूर : महात्मा गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात दोन मिनिटे मौन राखून अभिवादन करताना प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव. सोबत डॉ. विलास शिंदे, डॉ. सागर डेळेकर.

# शिवाजी विद्यापीठात हुतात्मा दिन

**जनप्रवास : कोल्हापूर**

- महात्मा गांधी यांच्यासह हुतात्म्यांना केले अभिवादन

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त शुक्रवारी शिवाजी विद्यापीठात हुतात्मा दिन पाळण्यात आला. यावेळी दोन मिनिटे मौन राखून अभिवादन करण्यात आले.

शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवन इमारतीच्या प्रांगणात प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासह अधिकारी आणि प्रशासकीय सेवकांनी सकाळी ठीक ११ वाजता दोन मिनिटे स्तब्धता पाळून महात्मा गांधी यांच्यासह हुतात्म्यांना अभिवादन केले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, इनोव्हेशन व इनक्युबेशन केंद्राचे संचालक डॉ. सागर डेळेकर, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, संगणक केंद्राचे संचालक अभिजीत रेडेकर यांच्यासह प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यापीठाच्या अधिविभाग प्रमुखांसह शिक्षक, सेवक आणि विद्यार्थ्यांनी अभिवादन केले.

जनसंपर्क कक्ष
31 JAN 2026 पुढारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात हुतात्मा दिनानिमित्त अभिवादन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा स्मृतिदिन व हुतात्मा दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात अभिवादन करण्यात आले.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवन इमारतीच्या प्रांगणात प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासह अधिकारी व प्रशासकीय सेवकांनी सकाळी ११ वाजता दोन मिनिटे स्तब्धता पाळून महात्मा गांधी यांच्यासह हुतात्म्यांना अभिवादन केले.

यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, इनोव्हेशन व इनक्युबेशन केंद्राचे संचालक डॉ. सागर डेळेकर, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, संगणक केंद्राचे संचालक अभिजित रेडेकर आदी उपस्थित होते.

विद्यापीठाच्या सर्व अधिविभागांत आणि प्रशासकीय विभागांमध्येही सर्व अधिविभाग प्रमुखांसह शिक्षक, सेवक आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी यांनी आपापल्या जागेवर उभे राहून हुतात्म्यांना अभिवादन केले.

31 JAN 2026

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरू पदासाठी ११५ अर्ज दाखल

## डॉ. ज्योती जाधव यांच्यासह विद्यापीठातील १६ जणांचा समावेश

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरू पदासाठी राज्यभरातून ११५ पात्रताधारकांनी अर्ज केले आहेत. यात शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासह १६ जणांचा समावेश आहे.



कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचा पाच वर्षांचा कार्यकाल ६ ऑक्टोबर रोजी पूर्ण झाला. त्यांचा कार्यकाल संपण्यापूर्वी नूतन कुलगुरूची निवड होणे अपेक्षित होते. त्यानंतर कुलगुरू निवड समिती तीन सदस्यांपैकी एकाच सदस्याची निवड करण्यात आली. पुण्याच्या सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्याकडे शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरू पदाचा प्रभारी कार्यभार सोपवला आहे. कुलपती कार्यालयाने नूतन कुलगुरू पदासाठी २३ डिसेंबर ते २७ जानेवारी या कालावधीत अर्ज मागवले होते. भरतियार विद्यापीठ, कोईम्बतूर येथील गणित विभागाचे प्रा. एस. सरवनन यांची नोडल ऑफिसर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. अर्ज प्रक्रियेला दोन दिवसांची मुदतवाढ देण्यात आली. शेवटच्या दिवसापर्यंत ११५ जणांनी या पदासाठी अर्ज केले आहेत. यामध्ये शिवाजी विद्यापीठातील वाणिज्य विभागाचे डॉ. श्रीकृष्ण महाजन, पत्रकारिता विभागाच्या डॉ. निशा मुडे, रसायनशास्त्र विभागाचे डॉ. आर. जी. सोनकवडे, डॉ. सागर डेळेकर, डॉ. एस. एस. कोळेकर, डॉ. एस. व्ही. कोळेकर, आदींचा समावेश आहे. प्राप्त अर्जांची लवकरच छाननी करण्यात येणार आहे. त्यानंतर फेब्रुवारीमध्ये निवड समितीकडून मुलाखतीची प्रक्रिया पार पाडत पाच उमेदवारांची नावे अंतिम केली जातील. या पाचजणांमधून एकाची कुलगुरू म्हणून निवड केली जाणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

31 JAN 2026
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूपदाच्या शर्यतीत प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, डॉ. श्रीकृष्ण महाजन

## राज्यभरातून ११५ जणांचे अर्ज : विद्यापीठातील १६ जणांचा समावेश; लवकरच अर्ज छाननी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूपदासाठी राज्यभरातून ११५ पात्रताधारकांनी अर्ज केले आहेत. यात प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासह १६ जणांचा समावेश आहे.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचा पाच वर्षांचा कार्यकाल ६ ऑक्टोबर रोजी पूर्ण झाला. त्यांचा कार्यकाल संपण्यापूर्वी नूतन कुलगुरूची निवड होणे अपेक्षित होते. त्यानंतर कुलगुरू



निवड समिती तीन सदस्यांपैकी एकाच सदस्याची निवड करण्यात आली. पुण्याच्या सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्याकडे शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूपदाचा प्रभारी कार्यभार सोपवला आहे. कुलपती कार्यालयाने नूतन कुलगुरूपदासाठी २३ डिसेंबर ते २७ जानेवारी या कालावधीत अर्ज मागवले होते.

भरतियार विद्यापीठ, कोईम्बतूर येथील प्रा. एस. सरवनन यांची नोडल ऑफिसर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. अर्ज प्रक्रियेला दोन दिवसांची मुदतवाढ देण्यात आली. शेवटच्या दिवसापर्यंत ११५ जणांनी या पदासाठी अर्ज केले आहेत. यामध्ये शिवाजी विद्यापीठातील वाणिज्य विभागाचे डॉ. श्रीकृष्ण महाजन, पत्रकारिता विभागाच्या डॉ. निशा मुडे, रसायनशास्त्र विभागाचे डॉ. आर. जी. सोनकवडे, डॉ. सागर डेळेकर, डॉ. एस. एस. कोळेकर, डॉ. एस. व्ही. कोळेकर आदींचा समावेश आहे. प्राप्त अर्जाची लवकरच छाननी करण्यात येणार आहे. त्यानंतर फेब्रुवारीमध्ये निवड समितीकडून मुलाखत होऊन पाच उमेदवारांची नावे अंतिम केली जातील. या पाच जणांमधून एकाची कुलगुरू म्हणून निवड केली जाणार आहे.